### मृत्यू पत्रात वारसदारा ऐवजी न्याय प्रविष्ठ प्रकरणात पिटीआर वर लावले दुसरेच नाव

# माजलगाव नप चा अजब कारभार

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील जुन्या मोंढ्यामध्ये असलेल्या करोडो रुपयांच्या ५ दुकानांना वारसदार नसताना येथील न.प.चे मुख्याधिकारी यांच्याशी संगणमत करून नाव लावण्याचा प्रकार उघड झाला आहे. विशेष म्हणजे रजिस्टर्ड मृत्युपत्राद्वारे भावाचे लावले असताना व भावाच्या मृत्यूनंतर त्याच्या पत्नीचे नाव या जागेला नाव लावणे आवश्यक होती परंतु तसे न केल्यामुळे व मुख्याधिकाऱ्यांकडून लावलेले




नाव पीटीआर वरून कमी करण्यास टाळाटाळ केल्यामुळे नातेवाईकांनी न.प. समोर ८जानेवारी बुधवार रोजी पासुन उपोषण सुरू केले आहे. प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार राजाराम धोंडीराम जोगडे यांची येथील जुन्या मोंढ्यात १०-११८/६ - ३३४ /१ या मिळकतीची ६० बाय ३० स्क्वेअर फुट जागा होती. त्यांना मुलबाळ नसल्यामुळे त्यांनी त्यांचे बंधू निवृत्ती धोंडीराम जोगडे यांच्या नावे २५ नोव्हेंबर २०१३ साली ४५१३/२०१३ मध्ये रजिस्टर्ड मृत्युपत्र बनवून त्यांना वारसदार केले होते. राजाराम जोगडे यांचा मृत्यू २४ मे २०२१ मध्ये झाला. तर त्यांचे बंधू निवृत्ती जोगडे यांचा मृत्यू २९ मे २०२१ साली झाला होता. दोन्ही भावाचा मृत्यू झाल्यानंतर व रजिस्टर्ड मृत्यू पत्राआधारे राजाराम जोगडे यांचे बंधू निवृत्ती जोगडे यांचे नाव सदर जागेला नाव लावने आवश्यक होते. त्यानुसार येथील नगरपालिके मध्ये १९ जुलै २०२१ निवृत्ती जोगडे यांचे नाव सदरील जागेला लावण्यात आले.

## गितांजली लव्हाळे यांना शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**वडवणी । प्रतिनिधी**

प्रति वर्षी समाजातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणार्या व्यक्तींना मैत्री फाऊंडेशन महाराष्ट्राच्या वतीने शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देवून सन्मान करण्यात येते. या वर्षीचे पुरस्कार नुकतेचे जाहीर झाले. या वर्षीच्या पुरस्कारासाठी वडवणी येथील इंग्लिश स्कूलच्या शिक्षिका श्रीमती गितांजली लव्हाळे मॅडम यांना जाहीर झाला. सदरील पुरस्कार जाहीर होताच त्यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

प्रति वर्षी समाजातील साहित्य, कला, संस्कृती, शिक्षण यासह विविध सेवा क्षेत्रात उल्लेखनीय काम करणार्या व्यक्तींचा मैत्री फाउंडेशन महाराष्ट्र या संघटनेच्या वतीने शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊ सन्मानित केले जाते.



यंदाच्या २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार नुकताचे जाहीर झाले आहेत. शैक्षणिक, सामाजिक आणि पत्रकारितेच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्याबद्दल यावर्षीच्या

शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वडवणी आणि वडवणी परिसरातील ग्रामीण भागात शैक्षणिक वर्ष सन २०१० पासून इंग्रजी स्कूलच्या माध्यमातून ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या वडवणी येथील इंग्लिश स्कूलच्या उपक्रमशील शिक्षका श्रीमती गितांजली रंगराव लव्हाळे मॅडम या वडवणी तालुक्यामध्ये खमक्या महिला पत्रकार म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांनी वडवणी पोलीस स्टेशन अंतर्गत महिला दक्षता कमिटीच्या सदस्या म्हणून काम करताना अनेकांना मदत केली. त्याच बरोबर त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाचे भरीव कार्य केले. तसेच गरजू महिलांना मोफत साड्या वाटप, गरीब विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटपाचे काम सातत्याने करतात

## जाहीर सूचना

### जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे कार्यालय

**शासकीय इमारत, चांदमारी वसाहत, धानोरा रोड, बीड ४३११२२**

**क्रमांक/आस्था-२/एस.आर७१/२०२४, बीड दिनांक ०६/०१/२०२५**

प्रति, १. मल्हारी आश्रुबा जगताप,रा. शिंदी ता.केज जि. बीड- अपिलदार

**विरूद्ध**

१. कारभारी जयवंता केदार, २. आनंता जयवंता केदार, ३. त्रिंबक जयवंता धुमक, ४. मुक्ताबाई उत्तम केदार, ५. सुरेखा बाळासाहेब, ६. सिंधुबाई अंकुश, ६. कडुबाई वैजनाथ, ७. नवनाथ रंगनाथ क्षिरसागर, ८. बळीराम भगवान केदार, ९. प्रकाश बाबासाहेब वायकसे, अ.पा.क. बाबासाहेब ज्ञानोबा वायकसे, १०. आदित्य बाबासाहेब वायकसे, अ.पा.क. बाबासाहेब ज्ञानोबा वायकसे, ११. प्रतिक पंडीत अ.पा.क. पंडीतराव -ज्ञानोबा वायकसे, १२. विनायक राजेंद्र कदम, १३. सर्जे राव बाजीराव कदम, १४. संतराम बाजीराव कदम, १५. रमेश जालिंधर कदम, १६. बाबु बाजीराव कदम, १७. मच्छिंद्र जालींधर कदम, १८. गवळणबाई भागवत जगताप, १९. त्रंबक प्रभाकर धुमक, २०.अंकुश बाबु पारवे, २१.नवनाथ रंगनाथ क्षिरसागर, २२. बाबासाहेब गिरजा भारडे, २३.लक्ष्मण बाबु पारवे, २४.बाबासाहेब हरीभाउ जगताप, २५. सर्जेराव बाजीराव कदम, २६. संतराम बाजीराव कदम, २७. विकास सदाशिव पाटुळे, २८. विश्वांभर गिरजा भारड, २९.केशरबाई अंकुश पारवे, ३०. सुरेश भगवान जगताप, ३१. चंद्रकला सुभाष जाधव, ३२. बाबु बाजीराव कदम, वरील सर्व राहणार शिंदी, ता. केज जि. बिड, ३३. पोटहिस्सा मोजणी अधिकारी तथा उप अधीक्षक भूमि अभिलेख, गेवराई -जाबदार

या जाहिर सुचनेद्वारे सुचित करण्यात येते की, अर्जदार यांनी गैरअर्जदार यांचेविरूद्ध जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे न्यायालयात मौजे शिंदी, ता. केज. जि. बीड येथील सर्वे नंबर ३५ मधील पोटहिस्सा मोजणीचा अंमल घेवुन कमी करण्यात आलेल्या क्षेत्राची दुरूस्ती करणे बाबत अपील महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील अर्ज दाखल केलेले आहे.

वरील गैरअर्जदार यांना जाहिर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, वरील प्रकरणी दिनांक ०५/०२/२०२५ रोजी वेळ सकाळी ११.३० वाजता जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे कायालय, चांदमारी वसाहत, पालवण चौकाजवळ, धानोरा रोड, बीड ता.जि.बीड यांचे समोर सुनावणी आहे. वरील नमुद गैरअर्जदार यांनी नमुद तारखेस न्याय कक्षेत सुनावणीस उपस्थित रहावे.

वरील नमुद गैरअर्जदार वरील नमुद तारखेस गैरहजर राहील्यास प्रकरणात एकतर्फी सुनावणी घेण्यात येईल व प्रकरण पुढे चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरीत)**
**कृष्णा शिंदे**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड**

शिक्का

## जि प प्रा शा हरकी निमगाव शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न



**माजलगांव । प्रतिनिधी**

दिनांक ३ जानेवारी २०२५ वार शुक्रवार रोजी शाळेची सहल हरकी निमगाव या ठिकाणावरून रात्री एकच्या सुमारास रांजणगावच्या दिशेने निघाली . सकाळी सहा वाजता रांजणगाव ला पोहोचलो. रांजणगावच्या मंदिरात गणपतीचे दर्शन घेऊन सहलीसाठी आशीर्वाद घेतला. त्यानंतर पुण्याच्या दिशेने रवाना झालो. पुण्यामधील परिसरामध्ये सुरुवातीला आगाखान पॅलेस या पर्यटन स्थळाला भेट दिली. आपल्या देशाचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या अतिशय सुंदर मूर्तीचा व त्यांच्या कार्याचा देखावा त्या ठिकाणी पाहावयास मिळाला. त्यानंतर कस्तुरबा गांधी समाधी स्थळ पाहिले. यानंतर राजीव गांधी राष्ट्रीय सर्प उद्यानामध्ये अनेक प्रकारचे साप,सरपटणारे विविध प्रकारचे प्राणी, वाघ, बिबट्या, गवा, वनगाय इत्यादी प्रकारचे प्राणी पाहावयास मिळाले. आमच्या मनामध्ये प्राण्याविषयी असणारी जिज्ञासा त्या ठिकाणी प्राण्यांना समोर पाहून पूर्ण झाली.यानंतर मुक्काम ासाठी आळंदीला पोहोचलो. संध्याकाळी जेवण,आराम करून सकाळी उठल्यानंतर ज्ञानेश्वर माऊली समाधी स्थळाचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात अतिशय शिस्तीचे पालन करून ज्ञानेश्वर माऊली समाधी स्थळाचे दर्शन घेतले. यानंतर आळंदी घाट, रेडा बोलविला,भिंत चालवली,इंद्रायणी नदी या ठिकाणांना भेट देऊन,आपल्या महाराष्ट्राचे भूषण, ज्यांनी या महाराष्ट्रामध्ये हिंदवी स्वराज्य स्थापन केले. शैक्षणिक सहल सुखरूप संपन्न झाली.

## जाहीर प्रगटन

### कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड

**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक, पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता. जि. बीड पिन ४३११२२**

**जावक क्र. २३, दिनांक ०६/०१/२०२५**

**तक्रार क्रमांक : - ६५८/२०२४**

अर्जदार :- शाम नानकराम वर्मा.

विरुध्द

गैरअर्जदार :- १. शाखाधिकरी,

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, शाखा मोंढा, बीड ता. जि. बीड २. मुख्य कार्याकारी अधिकारी, ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, मुख्य कार्यालय ज्ञानराधा भवन जालना रोड, बीड, ता.जि. बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १७/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक- ०६/०१/२०२५
ठिकाण - बीड

**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

शिक्का

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २६४/२०२४**

**विनोद शिवाजी नलावडे विरुद्ध ग्रा.पं. आहेरचिंचोली**

पहा

१. विनोद शिवाजी नलावडे, रा. आहेरचिंचोली ह. मु. लोळदगाव ता.गेवराई जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत भाऊराव बाबाजी नलावडे यांचा दिनांक ०१/०२/१९६० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास आहेर चिंचोली ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे आहेर चिंचोली ता.जि.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/१२/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख १०/०१/२०२५ ही आहे.

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार, बीड**

शिक्का

## जाहीरनामा

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय माजलगांव जि.बीड

**जा.क्र.२०२४/दंड विभाग/जन्म-मृत्यू नोंद/का.वि. १२७४**

**दि. २८/११/२०२४**

**जन्म-मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म-मृत्यु नोदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, अर्जदार **अर्जुन हरीभाऊ चव्हाण रा. मोगरा (माळतांडा) ता. माजलगांव जि.बीड** यांनी स्वतःच्या मुलाच्या नावे पृथ्वीराज अर्जुन चव्हाण यांचा जन्म दिनांक ०७/०६/२००८ रोजी मोगरा ता. माजलगांव, जि.बीड येथे झाला असुन अर्जदार यांनी सदर जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय मोगरा ता. माजलगांव, बीड यांचे नोंदवहीमध्ये घेऊन प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदार यांची जन्मतारीख व जन्मठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत त्याने या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच आपणांस कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहू अर्जदार यांच्या हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शावीत झाल्यास अर्जदारांचे स्वतः च्या नातलगांच्या जन्माबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्याचे अनुषंगाने विहित कार्यवाही करण्यात येईल.

आज दि. २८/११/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत)
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय**
**माजलगांव**

शिक्का

## जाहीर प्रगटन

### कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड

**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक, पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता. जि. बीड पिन ४३११२२**

**जावक क्र. २४, दिनांक ०६/०१/२०२५**

**तक्रार क्रमांक : -६५९/२०२४**

अर्जदार :- प्रकाश कचरू नेवडे.

विरुध्द

गैरअर्जदार :- १. शाखाधिकरी,

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, शाखा मोंढा, बीड ता. जि. बीड २. मुख्य कार्याकारी अधिकारी, ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, मुख्य कार्यालय ज्ञानराधा भवन जालना रोड, बीड, ता.जि. बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १७/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक- ०६/०१/२०२५
ठिकाण - बीड

**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

शिक्का

## जाहीर प्रगटन

### कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड

**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक, पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता. जि. बीड पिन ४३११२२**

**जावक क्र.२५, दिनांक ०६/०१/२०२५**

**तक्रार क्रमांक : -६६०/२०२४**

अर्जदार :- रुक्मिणी प्रकाश नेवडे.

विरुध्द

गैरअर्जदारः- १. शाखाधिकरी,

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, शाखा मोंढा, बीड ता. जि. बीड २. मुख्य कार्याकारी अधिकारी, ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, मुख्य कार्यालय ज्ञानराधा भवन जालना रोड, बीड, ता.जि. बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १७/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक- ०६/०१/२०२५
ठिकाण - बीड

**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

शिक्का

## जाहीर प्रगटन

### कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड

**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक, पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता. जि. बीड पिन ४३११२२**

**जावक क्र. २६, दिनांक ०६/०१/ २०२५**

**तक्रार क्रमांक : -६६१/२०२४**

अर्जदार :- १. चंदनबाई कचरू नेवडे.

विरुध्द

गैरअर्जदार :- १. शाखाधिकरी,

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, शाखा मोंढा, बीड ता. जि. बीड २. मुख्य कार्याकारी अधिकारी, ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, मुख्य कार्यालय ज्ञानराधा भवन जालना रोड, बीड, ता. जि. बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १७/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक - ०६/०१/२०२५
ठिकाण - बीड

**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

शिक्का

## जाहीर प्रगटन

### कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड

**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक, पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता. जि. बीड पिन ४३११२२**

**जावक क्र. २७, दिनांक ०६/०१/२०२५**

**तक्रार क्रमांक : -६६२/२०२४**

अर्जदार :- १. कैलास नारायण राउत.

विरुध्द

गैरअर्जदारः- १.शाखाधिकरी,

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, शाखा मोंढा, बीड ता. जि. बीड २. मुख्य कार्याकारी अधिकारी, ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट

सोसायटी लि. बीड, मुख्य कार्यालय ज्ञानराधा भवन जालना रोड, बीड, ता.जि. बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १७/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक - ०६/०१/२०२५
ठिकाण- बीड

**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

शिक्का

# अखेर बीड बायपासवर उड्डाणपुल, सर्व्हिस रोड च्या कामाला मान्यता

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी बीडकरांना दिलेला शब्द पाळला : डॉ.योगेश क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावर बीड शहरालगतच्या स्लीप रोडसह महालक्ष्मी चौकात उड्डाणपुल बांधण्यासंदर्भातील तांत्रिक शक्यता तपासण्याचे निर्देश केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने दि.२७ जून २०२४ रोजी दिले होते. ही कार्यवाही पूर्ण करून बहुप्रतिक्षित असलेल्या बीड बायपासवरील उड्डाणपुलांसह सर्व्हिस रोडच्या निविदा विभागाने काढल्या आहेत. या कामाबद्दल लोकसभा निवडणुकीत माजलगावच्या जाहीर सभेतून केंद्रीय मंत्री ना.नितीन गडकरी यांनी बीडकारांना दिलेला शब्द पाळत



वर्षभराच्या आता कामांच्या निविदा काढल्या, असे सांगून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी ना.गडकरींसह शिफारस करणाऱ्या नेत्यांचे आभार मानले आहेत.

सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाच्या बीडच्या वळण रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अपघात होतात. येथील महालक्ष्मी चौकात उड्डाणपूल तयार केला तर हे अपघात टाळता येतील, असे सांगत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाकडे प्रस्ताव दिला होता. यात महालक्ष्मी चौकातील उड्डाणपुलासोबतच तेलगाव आणि पिंपळनेर रस्त्यावरील स्लिप रोडची देखील मागणी करण्यात आली होती. या पत्रांचा संदर्भ देत ना.नितीन गडकरी यांच्या आदेशावरून भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाचे तांत्रिक सल्लागार बाळासाहेब ठेंग यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या नागपूर येथील प्रादेशिक अधिकार्यांना निर्देश दिले होते. यात उड्डाणपुल आणि स्लिप रोड संदर्भातील तांत्रिक शक्यता तपासून अहवाल सादर केला. त्यांनतर आता निविदा निघाल्या असून या कामाला गती मिळणार आहे. हा प्रश्न डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सतत लावून धरला. मागे लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान माजलगाव येथे जाहीर सभेत हा प्रश्न मार्गी लावण्याची घोषणा ना.नितीन गडकरी यांनी केली होती. त्यानुसार विभागाकडून पाऊले उचलली गेली. परळीत गतवर्षी शासन आपल्या दारी कार्यक्रमात तत्कालीन उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, ना.अजितदादा पवार, तत्कालीन पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याकडे बीड शहराजवळील उड्डाणपुलांसह स्लिप रोडचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली होती. त्या मागणीच्या अनुषंगाने दोघांनीही केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्रालयाकडे शिफारस केली होती. तसेच, मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी हा प्रलंबित प्रश्न ना.नितीन गडकरींच्या कानावर घातला होता. दरम्यान, उड्डाणपुलांसह स्लिप रोडचा प्रश्न मार्गी लागत असल्याने डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी यांच्यासह इतर नेत्यांचे आभार मानले आहे.

## उपळी हायस्कूल उपळीच्या श्रीमती सुनीता गायसमुद्रे आणि श्रीमती प्रज्ञा सौंदरमल यांना मातृभूमी प्रतिष्ठानचा आदर्श पुरस्कार जाहीर पुरस्कार




**उपळी । प्रतिनिधी**

उपळी हायस्कूल उपळी येथे पंचवीस वर्षापासून कार्यरत असणाऱ्या श्रीमती सुनिता गायसमुद्र मॅडम यांना व तेरा वर्षापासून उपळी येथील श्रीमती प्रज्ञा सौंदरमल यांना मातृभूमी प्रतिष्ठानचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला याबद्दल शाळेच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक भागवतराव बडे सर तसेच संस्थेचे कोषाध्यक्ष शेख मयूर सर यांच्या हस्ते नियुक्त पत्र देऊन सत्कार करण्यात आला यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख तथा पत्रकार प्रकाश गोरे सर उपस्थित होते यावेळी शाळेतील सर्व शिक्षक यांनी सुद्धा श्रीमती सुनिता गायसमुद्रे व श्रीमती प्रज्ञा सौंदरमल यांचे अभिनंदन करताना उपस्थित होते. यावेळी पर्यवेक्षक श्री शंकर घाडगे, श्रीमती परविन शेख,कालिदास वाघ,रमेश शेप,बालासाहेब सपकाळ,भागवत सावंत, हनुमान बडे,महादेव गोरे, अशोक जाधव,वसूवैभव जाधव,पंकज दुबे,मोहसीन शेख,रामप्रसाद इचके,जफर शेख यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# खेळाडू हिच जात आणि मैदान हाच धर्म : सचिन मुळूक

## जयभवानी विद्यालयात खो - खो स्पर्धेचा दिमाखदार उद्धाटन सोहळा संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

खेळाडू ही जात आणि मैदान हाच धर्म ही भुमिका घेऊन रणवीर पंडित हे गेवराई तालुक्याच्या क्रिडा क्षेत्रात उत्तम काम करत आहेत, एक दिवस आंतरराष्ट्रीय पातळीवर या गेवराईच्या मातीतील खेळाडू चमकेल. रणवीर पंडित यांनी जिल्हा पातळीवर असा क्रीडा महोत्सव घेऊन खेळाडूंना मोठी संधी उपलब्ध करून द्यावी असे आवाहन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळक यांनी केले. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवाच्या चौथ्या दिवशी खो-खो स्पर्धेचे उद्घाटन करताना ते बोलत होते. शारदा स्पोर्ट्स अॅकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाच्या अंतर्गत भव्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. बुधवार



दिनांक ८ जानेवारी रोजी गढी येथील जयभवानी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयाच्या भव्य मैदानावर खो -खो स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळक, स्वप्निल गलधर, दै. लोकमतचे जिल्हा प्रतिनिधी सोमनाथ खताळ यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर होते.

# बार्शी नाका, सोमेश्वर मंदिर जवळील पुल झाले डम्पिंग ग्राउंड

## सि.ओ.अंधारे यांनी स्वत: फिरून बीड शहराची दुरवस्था पहावी

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील बार्शी रोड वरील सोमेश्वर मंदिरा जवळ असलेल्या पुलाच्या दोन्ही बाजूस कचरा, घान, मांस टाकत असल्याने सोमेश्वर मंदिरात येणाऱ्या भाविक भक्त, नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असून नाक दाबूनच जावे लागत आहे. तर हा कचरा पेटवून दिल्याने रस्त्यावर धुराची लोळचे लोळ पसरल्याने पुलावरून जाणे देखील मुश्किल झाले, या पुलाजवळील कचरा





पेटवून दिल्याने पूला जवळून जाताना उग्र वासाने नागरिक हैराण झाले आहेत.त्यामुळे पूलावरून जाताना नाक दाबूनच जावे लागत आहे.बार्शी रोड परिसरातील सर्वच हॉटेल, चिकन, मटण शॉप, मंगल कार्यालये, दवाखाने, बिर्याणी हाऊस, चायनिज हॉटेल यांना नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी काही दिवसापूर्वी नोटिस दिल्या होत्या दिल्या होत्या परंतु त्या नोटीसला केराची टोपली दाखवली. हॉटेल,चिकन, मटण शॉप, चायनीज हॉटेल, दवाखान्यातील कचरा घान, चिकन, मटण शॉप वाल्यांनी मांस, मंगल कार्यालय चालकांनी उरलेले अन्न किंवा मांस या पुलाजवळ टाकण्यात येते. यावर नगर पालिका कर्मचाऱ्यांनी कारवाई करण्याची गरजआहे.

# ट्रेनी शिक्षकाचा कार्यकाळ एक वर्ष वाढवा मानधन तत्काळ करा, अन्यथा आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण कार्यक्रम योजना अंतर्गत कौशल्य विकास कार्यक्रम मध्ये प्रत्येक शाळेवर ट्रेनी शिक्षक नियुक्ती देण्यात आलेली आहे . प्रत्येक शाळेवर ट्रेनी शिक्षक यांना देण्यात आलेली नियुक्ती हि केवळ सहा महिने कालावधी असून हा कालावधी अपूर्ण असून शासनाने ट्रेनी शिक्षकाचा कार्यकाळ वाढवून एक वर्षाचा करण्यात यावा या मागणी करता बीड जिल्ह्यातील ट्रेनी शिक्षकाच्या वतीने बीड जिल्हाधिकारी कार्यालय मध्ये निवेदन देण्यात आले या वेळी ट्रेनी शिक्षकाचा कार्यकाळ वाढवून मानधन तत्काळ जमा करण्यात यावे, किमान वेतन कायद्यानुसार २०, ०००प्रतीमहा वेतन देण्यात यावे, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण



कार्यक्रम योजना अंतर्गत कार्यरत असणाऱ्या ट्रेनी शिक्षकाना आहे त्याच ठिकाणी कायम करण्यात यावे. जिल्हा परिषद शाळा मध्ये कमी पट असणाऱ्या ठिकाणी कंत्राटी शिक्षक भरण्या ऐवजी ट्रेनी शिक्षकाना नियुक्ती देण्यात यावी अशा विविध मागण्यासाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयात ट्रेनी शिक्षक संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले लवकरात लवकर या मागण्या पूर्ण न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा ट्रेनी शिक्षक संघटनेच्या वतीने देण्यात आला या वेळी राजेंद्र आमटे, बाळासाहेब मोरे पाटील, त्रिंबक शिंदे, बुधनर धनंजय, लकडे नारायण, झणझणे कृष्णा, तावरे शोभा, धनवे प्रतिक्षा, मोरे वैष्णवी, सुरवसे अविनाश, आरती अविनाश नाईकवाडे, जगताप चंद्रकांत, संग्राम काळकुटे.

# प्रोफेसर डॉ. नवनाथ काशीद यांचे वनस्पतीशास्त्र संशोधनातील दुसरे पेटंट

**केज । प्रतिनिधी**

येथील छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस, संचलित बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज , जिल्हा बीड, महाविद्यालयामधील वनस्पतीशास्त्र विभागामध्ये कार्यरत असणारे प्रोफेसर डॉ. नवनाथ काशीद यांच्या वनस्पतीअर्काचे गुणात्मक विश्लेषक यंत्र या संशोधनास युरोपीय राष्ट्रांकडून (णघ)युनायटेड किंग्डम कडून पेटंटला मान्यता देण्यात आली आहे. मानवी जीवनामध्ये वनौषधीचे खूप मोठे योगदान आहे . वैद्यकीय व आयुर्वेदिक क्षेत्रामध्ये वनस्पतीच्या अर्कापासून विविध औषधे बनवली जातात जी मानवाच्या सर्वांगीण सुदृढ व निरोगी आयुष्यासाठी उपयोगाची आहेत. वनस्पती मधील हे सर्व वनस्पतीअर्क, त्यांचे एकात्मक पद्धतीने गुणात्मक विश्लेषण करण्याचे एकच यंत्र विकसित करून हे संशोधन युरोपीय राष्ट्रांकडे मान्यतेसाठी पाठवले होते व नुकतेच त्यास युरोपीय राष्ट्रांनी मान्यता दिली आहे. प्रोफेसर डॉ. नवनाथ काशीद यांना या अगोदरही वनस्पती मधील अनुवंशिक बदल व त्याचे परिणाम शोधण्यासाठीची जीवरासायनिक विश्लेषण यंत्र या संशोधनास युरोपीय राष्ट्रांनी पेटंट जाहीर केले होते.

डॉ. काशीद यांच्या या संशोधनपर उपक्रमाबद्दल श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस चे सचिव श्री रमेशरावजी आडसकर , संचालिका श्रीमती अर्चनाताई आडसकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव फावडे सर , महाविद्यालयातील सर्व कर्मचारी , प्राध्यापक यांनी विशेष कौतुक व अभिनंदन केले आहे

# सुभेदार मुरलीधर क्षीरसागर यांचे सैन्यदलातील योगदान अविस्मरणीय : काँग्रेस नेते दत्ता कांबळे

## काँग्रेसच्या वतीने सेवापूर्ती निमित्त भारतीय जवानाचा यथोचित सन्मान

**माजलगाव । प्रतिनिधी**

सैन्य दलात सुभेदार मुरलीधर क्षीरसागर यांचे योगदान अविस्मरणीय आहे, अशा शब्दांत काँग्रेस नेते दत्ता कांबळे यांनी कौतुक केले. ते क्षीरसागर यांच्या सेवा निवृत्ती प्रीत्यर्थ आयोजित सन्मान सोहळ्यात बोलत होते. ई. एम. ई. या सैन्यदलात तेवीस वर्ष दीर्घ देशसेवा करत सुभेदार मेजर या ई. एम. ई या सैन्यदलातील सर्वोच्च हुद्द्यावर पोहचणारे सुभेदार मेजर मुरलीधर एकनाथ क्षीरसागर यांची ३१ डिसेम्बर २०२४ रोजी जम्मू आणि काश्मीर राज्यात नग्रोटा येथे कार्यरथ असताना सेवेतून निवृत्ती झाल्याने भारतीय काँग्रेस अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष तथा आंबेडकरी चाळवळीचे कार्यकर्ते दत्ता कांबळे यांनी भारतीय काँग्रेस



पक्षाच्या वतीने पुष्पहार, मानाचा शेला, श्रीफळ व कंदी पेढा भरवत सत्कार करण्यात आला. ई. एम. ई. सुभेदार मेजर मुरलीधर एकनाथ क्षीरसागर हे शहरालगत असणाऱ्या पुनर्वसीत खानापूर या गावाचे रहिवाशी असून, २००२ साली सैन्यदलात भरती होऊन, ते तब्बल तेवीस वर्षांनी देशाची सन्मान जनक सेवा करत, सुभेदार मेजर मुरलीधर एकनाथ क्षीरसागर यांना अनेक पदकांनी सन्मानित करण्यात आले आहे. घरची परिस्थिती अगदीच बेताचीच, त्याच्यावर मात करत त्यांनी देशाची सेवा हा एकमेव ध्यास उराशी बाळगून त्यांनी तब्बल तेवीस वर्ष देशाची सेवा करत यशस्वी सेवापुर्ती केली असल्यामुळे भारतीय काँग्रेसच्या वतीने त्यांच्या सेवापुर्ती निमित्त सत्कार करून भारतीय जवानाचा सन्मान केला.

# गहिनीनाथ यात्रेनिमित्त रंगल्या भव्य दिव्य जंगी कुस्तीच्या दंगली

- महाराष्ट्र केसरी पै.सय्यद चाऊस विशेष यांची उपस्थिती
- सावित्रीच्या लेकीच्या कुस्तीने उपस्थितांचे मन वेधले
- तिन दिवसीय यात्रेला हजारो भाविक भक्तांची उपस्थिती
- युवा सरपंच मयुरशेट आंधळे यांनी केले चोख नियोजन
- मराठवाड्यातील जवळपास ७०० ते ८०० पैलवानांनी घेतला सहभाग

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील रुई पिंपळा येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी तिन दिवसीय गहिनीनाथ यात्राचे सुरेख नियोजन करण्यात आले होते. यावेळी भव्य कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. ही प्रथा गेल्या अनेक वर्षापासून रुई पिंपळा येथे प्रथा जपली जात आहे. याहीवर्षी देखील मोठ्या उत्साहात महाराष्ट्र केसरी पैलवान सय्यद चाऊस यांच्या उपस्थितीत कुस्त्यांच्या दंगली पार पडल्या आहेत. या विशेष कुस्ती सामने कार्यक्रमासाठी माजी आमदार श्री. केशवदादा आंधळे साहेब, महाराष्ट्र केसरी पै.श्री. शिवाजीराव केकान, बीड जिल्हा कुस्तीगीर व मल्ल संघाचे उपाध्यक्ष श्री. शिवशंकर अण्णा कराड, तसेच जेष्ठ उस्ताद श्री. बाळूभाऊ आवारे साहेब, माजी सरपंच श्री.





शंकरराव आंधळे, माजी क्रीडा शिक्षक श्री. मधुकर धस सर, प्रशासकीय अधिकारी श्री. शैलेश आंधळे, जेष्ठ मुकादम श्री. कांताबापू आंधळे, जेष्ठ वकील रवीं. श्री. आबासाहेब आंधळे, जेष्ठ वकील श्री. रवीं प्रभाकर आंधळे, पै. महादेव मुजमुले, ई प्रमुख उपस्तिथी होते. याबाबत अधिक माहिती अशी की, रुई पिंपळा येथे तिन दिवसीय गहिनीनाथ यात्राचे उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पहिल्या दिवशी संदल कार्यक्रम पार पडला तर दुसऱ्या दिवशी गहिनीनाथाच्या दर्शनासाठी हजारो भाविक भक्तांची गर्दी केली होती. या यात्रा उत्सवात विविध खेळण्याच्या दुकाना व आकाश पाळणे विविध प्रकारचे मोठमोठ्या दुकाणा आसतात रात्री कला मंडळ असे विविध सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच तिसऱ्या दिवशी भव्य कुस्त्यांचे आयोजन महाराष्ट्र केसरी पैलवान सय्यद चाऊस यांच्या उपस्थितीत केले होते. लहान मुलांपासून ते मोठ्या व्यक्तींच्या कुस्त्या पार पडल्या. यावर्षी मराठवाड्यातून आलेल्या नामांकित कुस्तीगिरांमुळे कुस्तीशौकिनांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी कुस्त्या ठरल्या. यामध्ये मुलींच्या कुस्तीने उपस्थित त्यांचे मन वेधले होते. कुस्तीची सुरुवात १० रु पासून ते १७ हजार रुपये पर्यंत बक्षीस देण्यात आले आहे. आनंदाच्या वातावरणात कुस्त्या पार पडल्या आहेत. यामध्ये मराठवाड्यातील पैलवान मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शेवटी नामांकित कुस्तीपटू यांच्या आकर्षक कुस्त्या घेण्यात आल्या आणि शेवटी विजयी ठरलेल्या कुस्तीपटूला मान्यवरांच्या हस्ते नगदी १७ हजार रुपये देण्यात आले आहे. यावेळी रुई पिंपळा सह पंचक्रोशीतील कुस्तीशौकिनांनी कुस्त्याचा आनंद घेतला आहे. गहिनीनाथ यात्रेचे चोख व सुरेख नियोजन रुईचे युवा सरपंच मयुरशेट आंधळे व रुई ग्रामस्थ आणि गहिनीनाथ यात्रा उत्सव समितीने माजी आमदार केशवराव आंधळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिनकरराव आंधळे, शंकरराव आंधळे, माजी सरपंच संजयभाऊ आंधळे, यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते.

